ePaper
वर्ष - 7 । अंक - 93 | UDYAM-MH-26-0158827
महाईन्यूज (TM)
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!
www.mahaenews.com | । गुरुवार, दिनांक 3 ऑगस्ट 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# “संभाजी भिडे आमचे गुरुजी”: देवेंद्र फडणवीस




## आतील पानांत
- टीम इंडियाने मारली बाजी!
- वाणी कपूरचा रॅम्प वॉक
- राज्यसभेत ‘शांतते’त कामकाज
- पालकमंत्री पदावरही लक्ष


# अरे ऐ अबू आझमी, शिवाजी महाराजांना मानतो ना, मग, औरंग्याला गळा का लावतो?

## » महेश लांडगे यांचे रौद्ररूप : विधानसभा सभागृहात पिंपरी-चिंचवडचा ‘वाघ गरजला’

।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भाजपाचे भोसरी विधान सभेचे आमदार महेश लांडगे यांचे रौद्ररूप आज विधानसभेत पहायला मिळाले. औरंगजेबाबत बोलणाऱ्या समाजवादी पक्षाचे आमदार अबू आझमी यांच्यावर आमदार लांडगे चांगलेच गरजले. याचा औरंगजेबाशी काय संबंध आहे असा सवाल करत छत्रपती शिवाजी महाराजांच्या विरोधात असणाऱ्यावर कारवाई करण्याची जोरदार मागणी त्यांनी केली.**



आमदार अबू आझमी हे छत्रपती शिवाजी महाराज की जय असे म्हणताच आमदार महेश लांडगे म्हणाले, अरे मग छत्रपती शिवाजी महाराज की जय म्हणतो आणि मग औरंगजेबाला का ळा लावतो. याचा काय संबंध औरंगजेबाशी, जर छत्रपती शिवाजी महाराजांना हा मानतो तर याचा औरंगजेबाशी काय संबंध असा संतप्त सवाल त्यांनी केला.

आमदार लांडगे बोलत असताना संपूर्ण सभागृह शांत होते. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी प्रश्न विचारा म्हटल्यावर आमदार लांडगे म्हणाले, याविषयी सभागृहात बरीच चर्चा झाली आहे. या सभागृहात आलेला प्रत्येक सदस्य हा छत्रपती शिवाजी महाराज यांना मानणारा सदस्य आहे. जो कोणी मानत नसेल त्याने हातवर करावा. जर तो छत्रपती शिवाजी महाराज यांना मानतो तर औरंगजेब, अफजलखानाला मानण्याचा त्याचा संबंध काय? असा प्रश्न आमदार लांडगे यांनी उपस्थित केला.

आरे जर तुम्ही या महाराष्ट्रात राहता, छत्रपती शिवाजी महाराजांना मानता तर औरंगजेबाला मानायचा तुमचा काय संबंध, ज्याने आमच्या राजाला, प्रजेला छळल, ज्याने आमचा धर्म बाटविण्याचा प्रयत्न केला. त्याच्यासाठी आमच्या सभागृहात भांडत आहात, अशा विकृतींना थांबवावे लागेल. गृहमंत्री महोदय अशा लोकांवर आपल्याला कडक कारवाई करावी लागेल. जे छत्रपती शिवाजी महाराजांच्या विरोधात आहेत. जे महाराष्ट्राच्या विरोधात आहेत. येथील धर्माच्या विरोधात आहेत. त्यांच्यावर कठोर कारवाई आपण करणार का, हा माझा प्रश्न आहे.

### देवेंद्र फडणवीस काय म्हणाले?

»गृहमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, महेशदादा लांडगे यांनी सांगितले. छत्रपती शिवाजी महाराजांना कोणी विरोध करत असेल त्यावर निश्चितपणे कारवाई केली जाईल. आणि मी मगाशी देखील सांगितले. औरंगजेब या देशात काही काळ शासक होता. पण, औरंगजेब आमचा हिरो कधीच होऊ शकत नाही.आणि हेही खरंच आहे की ज्याप्रकारे छत्रपती संभाजी महाराजांना त्या ठिकाणी अत्याचार करून औरंगजेबाने मारले हे कधीच आम्ही विसरू शकत नाही. त्याच्यामुळे काहीही झाले तरी या देशामध्ये आणि महाराष्ट्रामध्ये औरंगजेबाचे महिमामंडन आम्ही सहन करणार नाही.

### व्हीडिओ महाराष्ट्रभर व्हायरल...

»दरम्यान, आमदार महेश लांडगे यांचा सभागृहातील हा व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला आहे. अनेकांनी व्हॉट्सअप टेट्सला हा व्हिडीओ ठेवला. फेसबुकवर शेअर केला आहे. संपूर्ण महाराष्ट्रभरातील शिव-शंभू प्रेमी नागरिकांनी संबंधित व्हीडिओ व्हायरल केला. महाराष्ट्रभरातून आमदार लांडगे यांच्या परखड भूमिकेचे कौतूक होत आहे.

# अट्टल दुचाकीचोर अखेर गजाआड!

## » थेरगावात कारवाई : दहा दुचाकी केल्या जप्त

। पिंपरी ।महाईन्यूज ।



दुचाकी चोरणाऱ्या जळगावातील टोळीला वाकड पोलिसांनी थेरगावातून अटक केली. त्यांच्याकडून पाच लाखांच्या दहा दुचाकी जप्त केल्या आहेत. दहा गुन्हे उघडकीस आले आहेत. कमलेश भागवत परदेशी (वय २२) शुभम राजेंद्र निकम (वय २०), पुष्पक दिलीप पाटील (वय २३) आणि प्रज्वल लालजी भोसले (वय २४, सर्व रा. चिंचवड, मूळ चाळीसगाव, जळगाव) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत.

वाकड पोलीस थेरगाव परिसरात गस्त घालत होते. चोरीच्या दुचाकी विक्रीसाठी चोरटे थेरगाव परिसरात येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी सापळा लावला. पोलीस दिसताच आरोपी पळून जाण्याचा प्रयत्न करू लागले. पोलिसांनी दुचाकींचा पाठलाग करून त्यांना ताब्यात घेतले. वाकड, चिखली, येरवडा, पिंपरी, चिंचवड परिसरातून दहा दुचाकी चोरल्याची कबुली दिली. आरोपींकडून पाच लाख रुपये किमतीच्या दहा दुचाकी जप्त केल्या आहेत.

### जीपीएस यंत्रणा बसविण्याचे पोलिसांचे आवाहन

» शहरात वाहन चोरीच्या गुन्ह्यांमध्ये वाढ होत आहे. त्यामुळे नागरिकांनी आपली वाहने सुरक्षित ठिकाणी पार्क करावीत. पार्किंगची व्यवस्था नसल्यास चैन, दुसरे कुलूप लावावे. जीपीएस यंत्रणा बसवून घ्यावी. वाहन सोसायटी, कंपनी, मॉल, दुकानांच्या बाहेर रोडवर लावू नयेत असे आवाहन पोलिसांनी केले.

# राजीव गांधी यांची तुलना मोदींसोबत!

## » राजीव गांधी यांची प्रतिमा मिस्टर क्लीनची होती

### » मोदींसारखा लोकप्रिय नेता दुसरा नाही : अजित पवार

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी माजी पंतप्रधान राजीव गांधी यांची तुलना सध्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी केली आहे. अजित म्हणाले, राजीव गांधी 'मिस्टर क्लीन' म्हणून ओळखले जात होते आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचीही तीच प्रतिमा आहे.**



गेल्या महिन्यात राष्ट्रवादीपासून फारकत घेऊन भाजप-शिवसेना सरकारमध्ये सहभागी झालेल्या पवार यांनी मंगळवारी पुण्यातील एका कार्यक्रमात ही माहिती दिली. पवार पुढे म्हणाले की, गेल्या 9 वर्षांपासून आम्ही पंतप्रधान मोदींचे काम पाहत आहोत. आंतरराष्ट्रीय स्तरावर मोदींसारखी लोकप्रियता असलेला दुसरा नेता नाही.

पायाभूत सुविधांच्या बाबतीत त्यांनी केलेले काम बघा, जगात भारताला वेगळ्या प्रकारचा मान मिळतो. अजित पवार म्हणाले, इंदिरा गांधी जेव्हा इतर देशांत जायच्या तेव्हा असाच सन्मान मिळत असे. पंतप्रधान मोदींना मंगळवारी लोकमान्य टिळक पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुण्यात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ज्यामध्ये महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आणि मुख्यमंत्री दोघेही सहभागी झाले होते. अजित म्हणाले, मोदींचा ताफा जात असताना पुण्यातील लोकांनी रस्त्याच्या दुतर्फा उभे राहून त्यांचे स्वागत केले. ताफ्यात मी आणि देवेंद्रजी (उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस) एकाच गाडीत होतो. कार्यक्रमस्थळी मोदींच्या प्रवासादरम्यान आम्हाला कोणतेही काळे झेंडे दिसले नाहीत. एवढेच नाही तर पवारांनी मणिपूर मुद्द्यावर पंतप्रधान मोदींच्या तिखट प्रतिक्रियेचं कौतुक केलं. पवार म्हणाले, कोणताही पंतप्रधान कायदा आणि सुव्यवस्थेच्या दृष्टिकोनातून देशात चांगले वातावरण निर्माण करण्याचा विचार करेल.

### मोदी दिवसाचे 18 तास काम करतात

» मणिपूरमध्ये जे काही चालले आहे त्याचे कोणीही समर्थन केले नाही. पंतप्रधानांनी या प्रकरणाची दखल घेतली आहे. भारताच्या सरन्यायाधीशांनीही त्याची दखल घेतली आहे. केंद्र आणि मणिपूर सरकार 3 मेच्या घटनेतील दोषींना (जेथे दोन महिलांची विवस्त्र धिंड काढण्यात आली होती) शिक्षा होईल याची खात्री करत आहे. पवार म्हणाले, मोदी दिवसाचे 18 तास काम करतात. ते म्हणाले, दिवाळीच्या काळात देशाचे इतर भाग घरी दिवाळी साजरी करत असताना सीमेवर लष्कराच्या जवानांसोबत साजरी करतात.

---

# नदीकाठच्या नागरिकांनी सतर्क राहावे!

## » आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांचे नागरिकांना आवाहन

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पावसामुळे धरण क्षेत्राच्या पाणी पातळीत (PIMPRI ) वाढ होत असून त्यातून नदीमध्ये पाण्याचा विसर्ग केला जात आहे. नदीतील पाणी पातळीची वाढ लक्षात घेता अशा परिस्थितीत कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवू नये यासाठी महापालिकेच्या वतीने आवश्यक खबरदारीच्या उपाययोजना घेण्यात येत असून नदीकाठच्या नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी केले आहे.**

पवना धरण सध्या 89.82 टक्के भरले आहे. तर मुळशी धरणाच्या सांडव्यावरून पाण्याचा नियंत्रित विसर्ग सोडला जाण्याच्या सुचना महापालिका प्रशासनाला मिळाल्या आहेत. या सर्व बाबी विचारात घेता प्रशासनाला सर्व यंत्रणा सज्ज ठेवण्याच्या सुचनाही त्यांनी दिल्या आहेत. मुळशी धरणाचा जलाशय साठा 479.95 दशलक्ष घनमीटर म्हणजेच 84 टक्के आहे तर उपलब्ध पात्राची क्षमता 90 दशलक्ष घनमीटर एवढी शिल्लक आहे.

सध्या परिस्थिती नियंत्रणात असली तरी सरासरी आवक आणि उपलब्ध धरण पात्राची क्षमता पाहता धरणाच्या सांडव्यावरून आज दूपारी 1 वाजता नियंत्रित विसर्ग मुळा नदीमध्ये सोडण्यात येणार आहे. त्यादृष्टीने नदीकाठच्या नागरिकांनी सतर्क राहावे, अशी सूचना मुळशी धरणाच्या प्रमुखांनी दिली आहे.



### अवमानकारक वक्तव्ये करण्याची भिडेंची खोड

» पावसात रस्त्यावरील विजवाहक तारा, विजेचे खांब, डी. पी. बॉक्स, फीडर बॉक्स, इत्यादी विदयुत वाहक ठिकाणांच्या संपर्कात येऊ नये तसेच अशा ठिकाणी जनावरे सोडू नये किंवा बांधू नये. औदयोगिक क्षेत्रात उघडयावर रासायनिक पदार्थांचा साठा करु नये. अशा ठिकाणी पाण्याचा संपर्क आल्यास दुर्घटना संभवू शकतात त्यामुळे त्यापासून नागरिकांनी जपून रहावे, असे आवाहन देखील बहिवाल यांनी (PIMPRI ) केले आहे.

मुळा नदी पिंपरी चिंचवड शहरातून (PIMPRI ) दापोडी लगत वाहत जाते. नदीत सोडण्यात येणाऱ्या विसर्गाचा परिणाम या भागातील नदीकाठच्या नागरिकांवर होण्याची शक्यता विचारात घेऊन या परिसरातील नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन आपत्ती व्यवस्थापन विभागाचे सह आयुक्त चंद्रकांत इंदलकर यांनी केले आहे. विसर्गामध्ये आवश्यक कमी अधिक बदल होऊ शकतो, त्यामुळे नदीपात्रात कोणीही उतरू नये. आपले साहित्य अथवा जनावरे असल्यास ते सुरक्षित स्थळी हलविण्यात यावे असे देखील त्यांनी सांगितले आहे. आपत्ती व्यवस्थापन प्रमुख ओमप्रकाश बहिवाल म्हणाले, आपत्कालीन परिस्थितीच्या अनुषंगाने आपत्ती व्यवस्थापन विभाग, अग्निशमन विभाग, क्षेत्रीय कार्यालये आणि इतर संलग्न विभागांनी सर्व यंत्रणा सज्ज ठेवल्या आहेत. सर्व क्षेत्रनिहाय पुरसदृश परिसराची पाहणी करून महापालिकेने पोलीस प्रशासनाच्या मदतीने संभाव्य पुरस्थितीमध्ये योग्य ती कारवाई करण्याचे नियोजन केले आहे. याचबरोबर पवना, मुळा, इंद्रायणी नद्यांचे धरण धरणप्रमुख, हवामान विभाग, तसेच एन. डी. आर. एफ, लष्कर यांच्याशीही समन्वय साधण्यात आला आहे. शहरातील पूरबाधित परिसरांमध्ये नागरिकांसाठी महापालिकेच्या शाळांमध्ये मदत शिबीरांचे नियोजन करण्यात आले असून या ठिकाणी स्वच्छता, आरोग्य, सुविधा आणि जेवणाची व्यवस्था महापालिकेच्या वतीने करण्याचे नियोजन केले आहे. आपत्कालीन परिस्थितीत घरांमध्ये पाणी शिरण्याची शक्यता लक्षात घेता पूरपरिस्थिती उद्भवल्यावर नदीकाठच्या नागरिकांनी सुरक्षित स्थळी हलविण्यासाठी क्षेत्रनिहाय क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली स्वतंत्र पथकाची नेमणूक करण्यात आली आहे.

# शहरात “मेरी मिट्टी मेरा देश अभियान”

## » आयुक्त शेखर सिंह यांची माहिती : प्रशासनाला दिले निर्देश

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव कार्यक्रमाच्या समारोपीय उपक्रमांतर्गत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे ‘मेरी मिट्टी मेरा देश’ अभियान देशभर राबविले जात आहे. पिंपरी चिंचवड शहरात देखील मोठ्या प्रमाणावर लोकसहभाग घेऊन हे अभियान उत्साही स्वरूपात नियोजनबद्ध पद्धतीने राबवा, असे निर्देश आयुक्त शेखर सिंह यांनी महापालिका प्रशासनाला दिले आहेत.**





स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत ‘मेरी मिट्टी मेरा देश’ (मिट्टी को नमन, वीरों को वंदन) हे अभियान संपूर्ण देशात राबविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. या अनुषंगाने आज महापालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनामध्ये आयुक्त शेखर सिंह यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली.

या बैठकीस अतिरिक्त आयुक्त विजय खोराटे, उल्हास जगताप, शहर अभियंता मकरंद निकम, मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी निळकंठ पोमण, मेरी मिट्टी मेरा देश उपक्रमाचे महानगरपालिका समन्वयक तथा उप आयुक्त मिनीनाथ दंडवते, स्मार्ट सिटीचे सह मुख्य व्यवस्थापकीय अधिकारी किरणराज यादव, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, शिक्षण विभागाचे सहाय्यक आयुक्त विजयकुमार थोरात, क्षेत्रीय अधिकारी सुचिता पानसरे, अमित पंडित, अण्णा बोदडे, किरणकुमार मोरे, उमेश ढाकणे, शितल वाकडे, राजेश आगळे, सीताराम बहुरे, सहाय्यक उद्यान अधिक्षक मंजुषा हिंगे आदी उपस्थित होते.प्रत्येक राज्यामध्ये गाव ते शहरांपर्यंत आपल्या माती विषयी जनजागृती, प्रेम आणि साक्षरता निर्माण व्हावी व या मातृभूमीसाठी झटणारे तसेच त्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या शुरविरांचा सन्मान व्हावा याकरिता मेरी मिट्टी मेरा देश अभियान राबविण्यात येत आहे.

त्यामध्ये विविध उपक्रमांचा समावेश आहे. या उपक्रमांतर्गत शहरातील संस्मरणीय अशा एका ठिकाणी शिलाफलकाची उभारणी करणे, महानगरपालिका हद्दीतील प्रभागनिहाय एक किंवा दोन मूठ माती घेऊन त्यातून शहराचा कलश तयार करून तो सन्मानपूर्वक स्थानिक स्वराज्य संस्थेच्या स्तरावरील समन्वयक अधिकारी यांच्याकडे सोपविणे असे विविध उपक्रम राबविले जाणार आहेत. त्यासाठी सर्व विभागांनी समन्वय साधून मोठ्या प्रमाणावर या कार्यक्रमात नागरिकांना सहभागी करून घ्यावे, अशा सूचना आयुक्त शेखर सिंह यांनी यावेळी दिल्या.

महापालिका स्तरावर १६ ते २० ऑगस्ट दरम्यान विविध उपक्रम राबविले जाणार आहेत. नागरिकांना सहभागी होण्यास प्रोत्साहित करण्यासाठी महापालिकेच्या वतीने विविध माध्यमांद्वारे आवाहन आणि जागृती करण्यात येणार आहे.

मेरी मिट्टी मेरा देश या अभियानामध्ये प्रमुख पाच उपक्रमांचा समावेश असून त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी संबंधित विभागांना त्यांच्या अखत्यारितील कामकाजाबाबत सूचना अतिरिक्त आयुक्त विजय खोराटे यांनी यावेळी दिले.

### ... असे आहेत कार्यक्रम

» महापालिका कार्यक्षेत्रातील ज्यांनी देशासाठी, स्वातंत्र्यासाठी आणि सुरक्षेसाठी बलिदान केले अशा संरक्षण दल, निम संरक्षण दल, पोलीस दलातील शहिदांच्या व स्वातंत्र्य सैनिकांच्या परिवारातील सदस्यांचा तसेच आजी किंवा माजी सैनिकांचा सन्मान महापालिकेच्या वतीने करण्यात येणार आहे. तसेच महापालिका स्तरावरील लोकप्रतिनिधी, अधिकारी, कर्मचारी, शासकीय कार्यालये आणि शहरवासीयांनी प्रतिज्ञा घेण्याबाबत शासनामार्फत सूचना देण्यात आल्या आहेत तर महापालिकेच्या वतीने शहरातील योग्य अशा एका ठिकाणी कार्यक्रम घेऊन राष्ट्रगीत गायन व ध्वजारोहन कार्यक्रम आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती महापालिकेच्या वतीने देण्यात आली आहे.

### अभियानात 5 उपक्रमांचा समावेश

» या अभियानामध्ये विविध ५ उपक्रमांचा समावेश आहे. त्यामध्ये शहरातील संस्मरणीय अशा एका ठिकाणी शिलाफलकाची उभारणी करण्यात येणार असून त्यावर स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव लोगो, नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाव, दिनांक, देशाचे पंतप्रधान यांचा संदेश, स्थानिक शहीद वीरांची नावे, ‘मातृभूमीचे स्वातंत्र्य आणि तिचा गौरव यांच्या रक्षणाकरिता प्राणांची आहुती दिलेल्या शुरवीरांना विनम्र अभिवादन’ असे वाक्य देखील शिलाफलकावर नमूद करण्यात येणार आहे. तसेच देशाच्या स्वातंत्र्याला ७५ वर्षे पुर्ण झाल्याचे औचित्य साधून शहरातील योग्य जागा निश्चित करून “वसुधा वंदन” म्हणून विविध देशी प्रजातींच्या ७५ रोपट्यांची लागवड करून अमृतवाटिका तयार करण्यात येणार आहे

---

# स्मार्ट सिटीकडून मोफत ‘वाय फाय’

## » 215 ठिकाणांपैकी 87 ठिकाणी सुविधा

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड स्मार्ट सिटी कंपनीने पिंपरी येथील महापालिका भवन आणि संत तुकारामनगर येथील यशवंतराव चव्हाण स्मृती (वायसीएम) रुग्णालय या दोन ठिकाणी वाय फाय सुविधा नुकतीच सुरू केली आहे. इतर कार्यालयातही ती सेवा लवकरच सुरू करण्यात येणार आहे.त्या सेवेचा मोफत लाभ महापालिका अधिकारी व कर्मचाऱ्यांना तसेच, त्या ठिकाणी आलेल्या नागरिकांना घेता येणार आहे, असा दावा स्मार्ट सिटी कंपनीने केला आहे.**




वाय फाय सेवा घेण्यासाठी प्रथम आपल्या मोबाईलमधील सेटींगमध्ये जाऊन वाय फाय सुविधा इनबिल्ड करावी. त्यानंतर ॲव्हलेबल नेटवर्कमध्ये पीसीएमसी स्मार्ट सिटी या ऑपरेशनवर क्लिक करावे. मोबाईल स्क्रीनमधील पीसीएमसी ऑफिसर / स्टाफ युजर्स या ऑप्शनवर क्लिक करावे.

पीसीएमसी स्टाफ युजर्स या ऑप्शनला क्लिक केल्यानंतर नवीन स्क्रीन उपलब्ध होईल. त्या स्क्रीनमध्ये एम्प्लाई आयडी या रकान्यात कर्मचारी क्रमांक नमूद करून, पासवर्ड हा सेवानिवृत्तीचा दिनांक टाकावा. त्यानंतर ॲस्पेट द टर्म ॲण्ड कंडीशन येथील चेक बॉक्सवर क्लिक करावे. स्क्रीनवर माहिती समाविष्ट केल्यानंतर मोबाईलवर माहिती दिसेल. त्यानंतर मोबाईलवर वाय फाय सुविधा सुरू होईल.

### अधिकारी काय म्हणतात?

» महापालिका कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना या सेवेचा लाभ घेता येणार आहे. त्यांनी मोबाईल क्रमांक नोंदविल्यानंतर मोबाईलवर ओटीपी प्राप्त होईल. वाय फाय सुविधा सुरू करण्यासाठी तांत्रिक अडचण निर्माण होत असल्यास एल अँड टी कंपनीचे फिल्ड इंजिनिअर यांच्याशी ९५५२३९२१३०, ९५०३१८६८१९ व ७३७२०३६०५१ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन स्मार्ट सिटीचे मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी निळकंठ पोमण यांनी केले आहे. शहरामध्ये २१५ ठिकाणी वाय फाय लावण्यात आले आहे. यापैकी ८७ ठिकाणी वाय-फाय सुरु आहे. ७६० एक्सेस पॉईटपैकी ३५७ पॉईट सध्या लाईव्ह केले आहेत. नागरिकांच्या मोबाईलद्वारे वाय-फाय सुविधा सुरु होईल, असा दावा स्मार्ट सिटी कंपनीने केला आहे.

---

# डोळे येण्याची साथ फोफावली, शहरातील 2723 जणांना प्रादुर्भाव

। पिंपरी ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

आळंदीनंतर आता पिंपरी चिंचवड शहरामध्ये डोळे येण्याची साथ आली असून त्याचा प्रादुर्भाव झपाट्याने होत आहे. 20 जुलैपासून शहरातील 2723 जणांना प्रादुर्भाव झाला आहे. त्यात शाळेतील मुलांचे प्रमाण सर्वाधिक आहे. डोळ्यांचा विषाणू संसर्ग हा मुख्यत्वे ॲडिनो व्हायरसमुळे होतो. वातावरणातील अनिश्चित बदलांमुळे आता साथीचे रोग पसरत आहेत. त्याचाच एक भाग म्हणजे डोळे येणे. सध्या डोळ्यांची साथ पसरली आहे. लहान मुलांना डोळे येण्याचं प्रमाण अधिक आहे. यंदा डोळ्यांचा संसर्ग सौम्य स्वरुपाचा दिसत असला तरी संसर्ग मात्र मोठ्या प्रमाणात आहे. पिंपरी-चिंचवड शहरात 20 जुलैपासून 2723 जणांना प्रादुर्भाव झाला आहे. दिवसाला 300 जणांना प्रादुर्भाव होत आहे. यापैकी एकाही जणाला रुग्णालयात दाखल करावे लागले नाही. महापालिकेच्या सर्व रुग्णालयात या रुग्णांवर उपचार केले जात आहेत. डोळ्यात सोडण्याचे औषध देवून रुग्णाला घरी सोडले जाते. त्यावर रुग्ण बरे होत आहेत. ज्या शाळेत पाचपेक्षा जास्त मुलांना प्रादुर्भाव झाल्यास त्याची माहिती वैद्यकीय विभागाला देण्याबाबत मुख्याध्यापकांना पत्र दिले आहे. शाळेने तपासणीस बोलविल्यास वैद्यकीय टीम शाळेत जावून मुलांची तपासणी करत असल्याचे अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभयचंद्र दादेवार यांनी सांगितले. आजाराची लक्षणे डोळे लाल होणे, डोळ्यांची जळजळ होणे, डोळे दुखणे, पाणी येणे, ताप आल्यासारखे होणे, प्रकाश सहन न होणे ही लक्षणे आहेत.




# जवानांहाती समाजमाध्यमे अधिक घातक!

**आजचे तरुण ज्या काळात वाढताहेत तो स्मार्टफोनचा काळ आहे. रील्स, टिकटॉक, फेसबुक, ट्विटर... काहीच नाही तर व्हॉट्सॲप ग्रुप अशासारखी 'समाजमाध्यमे' या तरुण पिढीच्या हातात आहेत, हे तर सरसकटच दिसते. पण जी गोष्ट आपल्याला जाणवूनदेखील आपण मान्य करत नाही ती म्हणजे, सामाजिक वातावरणच या समाजमाध्यमांच्या स्फोटामुळे ढवळून निघाले आहे, गढूळसुद्धा झालेले आहे.**



तशात लष्करामधील किंवा अन्य सेवांमधील, निमलष्करी दलांमधील सशस्त्र जवानांवर – समाजमाध्यमांचा काय परिणाम होत असेल? जयपूर- मुंबई एक्स्प्रेसमध्ये 'रेल्वे सुरक्षा बल' या निमलष्करी दलातील एका तरुणाने केलेला गोळीबार (आणि तसे करताना त्याची वक्तव्ये) ही तर कालचीच घटना. ती समजा क्षणभर बाजूला ठेवली तरीही काय चित्र दिसते? पाश्चिमात्य देशांमध्ये लष्करी कर्मचाऱ्यांकडून सेवाकाळात 'समाजमाध्यमां'च वापर कसा केला जातो आणि या ऑनलाइन क्रियाकलापांचा लष्करी कर्मचाऱ्यांच्या राजकीय अभिमुखतेवर- म्हणजे त्यांच्या राजकीय/ सामाजित मतांवर- काय परिणाम होतो हे समजून घेण्यासाठी अनेक अभ्यास आजवर केले गेले आहेत. मात्र सध्याच्या काळातील समाजमाध्यम-प्रभावित तरुण पिढी सेवेत नव्याने प्रवेश करू इच्छिते, तेव्हा या भरती-इच्छुक तरुणांच्या डोक्यात अगोदरपासूनच समाजमाध्यमांनी कायकाय दिवे लावलेले असतात, याबद्दल फारच कमी अभ्यास झालेला आहे. भारतात तर या मुद्द्यांवरचा कोणताही अधिकृत अभ्यास आजवर उपलब्ध नाही. मुळात या समाजमाध्यमांच्या परिणामामुळे, दोन दशकांपूर्वीच्या भरतीपेक्षा आजची भरती प्रक्रियाच वेगळी असायला हवी काय, असा अभ्यास करण्याची निकड अलीकडच्या काळातील (आरपीएफ जवानाने केलेल्या गोळीबाराच्या आधीच घडलेल्या) दोन घटनांवरून दिसून येते. यापैकी एक घटना काश्मीरमधील काही जवानांनी भारतीय सशस्त्र दलांसाठीच्या शिस्तीचा मानदंड ओलांडण्याची (जिच्याबद्दल कोणतेही खंडन आजतागायत झालेले नाही). दुसरी घटना म्हणजे भारतीय लष्करावर समाजमाध्यमांविषयी निर्देश देण्याची वेळ आली, ही. 'समाजमाध्यमांवरून लष्कराची प्रतिमा डागाळू नका- नाहीतर तुमचे निवृत्तीवेतन थांबवण्याची कारवाई केली जाईल' अशा अर्थाचे हे निर्देश निवृत्त लष्करी अधिकारी व जवानांसाठी आहेत. पण सेवेतील जवानांसाठी काहीएक समाजमाध्यम- आचारसंहिता असायला हवी. ती हवीच, कारण आजचे सामाजिक वातावरण मोहमय आणि विखारीदेखील आहे – एकीकडे उपभोगवादाची ओढ आणि त्यासाठी कुमार्गाने पैसा कमावण्याच्या मोहजालात फसवण्यासाठी समाजमाध्यमे समर्थच आहेत, पण मोह एवढेच नाहीत. प्रसिद्धीच्या झोतात राहण्याचे आमिष आहे, राजकीय आणि सामाजिक संस्कार यांची तमा न बाळगता, मूल्ये आणि नैतिकता पायदळी तुडवणाऱ्या टिप्पण्या करण्याचाही मोह आहे. त्याहीपेक्षा अधिक चिंताजनक गोष्ट म्हणजे सांस्कृतिक, वांशिक, भाषिक आणि धार्मिक ध्रुवीकरणाचा कल. अगदी शालेय स्तरापासूनच हे मतभेद किती विखारी आहेत, हे दाखवणारे व्हिडीओ पुन्हा समाजमाध्यमांवरच ओतप्रोत सापडतात. समाजमाध्यमे ही तिरस्कारातून आणखी तिरस्काराकडे नेणारी भट्टी ठरते आहे. या भट्टीतूनच सशस्त्र दले त्यांचे मनुष्यबळ – अधिकारी आणि सैनिक दोन्ही- निवडणार आहेत, हे आता गृहीत धरून, त्यावर उपाययोजना केल्या गेल्या पाहिजेत. तरुणांच्या भरतीवर समाजमाध्यमी विखाराचा काहीच परिणाम होणार नाही असा विचार करणे किंवा आशा करणे म्हणजे निष्काळजीपणा ठरेल. पहिले आव्हान म्हणजे प्रशिक्षण संस्था स्तरावर, प्रवेश केलेल्या सर्वांचेच 'डीटॉक्सिफिकेशन' – निर्विषीकरण- करणे! कारण सशस्त्र दलात सर्व भारतीयांना फक्त 'भारतीय' म्हणून पाहिले जाते. वंश, धर्म, जात, भाषा, प्रांत यांच्या पलीकडचे हे भारतीयत्व टिकवायचे, तर आधीपासून अस्तित्वात असलेल्या संघटित आणि संरचित प्रशिक्षण पद्धतींचे बारकाईने पुन्हा परीक्षण केले पाहिजे. काहीएक प्रमाणात सैद्धान्तिक शिक्षणही अशा कोणत्याही प्रयत्नासाठी पायाभूत मानावे लागेल, पण ते किती-कसे- कोणाकोणास देणार, याला मर्यादा आहेत. अखेर कनिष्ठस्तरीय नेतृत्वाच्या कृतींमधूनच हा सर्वनिरपेक्ष भारतीयपणा नव्या

## संपादकीय »

### चित्यांनो! परत फिरा

***कोण, कधी, कोणा हस्ते मरतो यावर आमच्याकडे त्या मरणाचे मोल ठरते. तुम्हाला हा धडा मिळायला नको होता.. तो मिळाला याचे दुःख आहे, म्हणून तुमची माफी..***

..असा कोणाचा हकनाक जीव गेला तरी आमच्यातल्या अनेकांना तसे काही वाटतही नाही. म्हणून तुमच्या मरणाचे दु:ख तसे कोणास नाही. तुमच्यात राजकीय पक्षही नसतात. त्यामुळे तुम्हांस ते कळणार नाही. बा चित्यांनो..! भारतात जबरदस्तीने आणवलेल्या तुमच्यातल्या आणखी एकाने आज प्राण सोडले. या देशातील समस्त जीव-प्रेमी, जीवादरी जनता आपली माफी मागू इच्छिते. तुमच्या चार पायांच्या राजिबडया जगात आणि जगण्यात अशी माफी मागण्याची नाटकी परंपरा नाही, हे ती जाणते. तो खोटेपणा आम्हा द्विपादांनाच शोभतो. माफीचे कसे असते की ती मागूनही स्वत:स हवे ते करता येते. किंवा हवे ते करून नंतर माफ करा असे म्हणता येते. ते केले काय आणि न केले काय, तसा काहीच फरक पडत नाही. 'मला फासावर लटकवा', 'मी माफी मागतो' वगैरे विधाने तशी नाटकीच.

**आजच्या युवांपुढचे खरे 'स्वातंत्र्य' कुठले – दारू पिण्याचे की दारूपासूनचे? लवकरच येऊ घातलेल्या सत्याहत्तराव्या स्वातंत्र्यदिनानिमित्ताने आपल्या देशाच्या लोकसंख्येचा सर्वात मोठा भाग असलेल्या युवा पिढीने या प्रश्नावर विचार करणे आणि स्वत:ची निश्चित अशी भूमिका बनवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. दारूविषयी वैयक्तिक व सामाजिक नीती काय असावी हा निव्वळ मतांचा विषय मानू नये.**

# युवकांनी गहाण ठेवलेले स्वातंत्र्य!

'ग्लोबल बर्डन ऑफ डिसीजेस' हा अख्ख्या जगातला सार्वजनिक आरोग्यावरील आजतागायतचा सर्वात मोठा अभ्यास असं सांगतो की, मृत्यू आणि अपंगत्वास कारणीभूत ठरणाऱ्या सर्वात वरच्या कारणांपैकी, दारू पहिल्या सातमध्ये आहे. दारूशी निगडित कारणांमुळे प्रत्येक दहा सेकंदाला एका व्यक्तीचा मृत्यू होतो.

जागतिक आरोग्य संघटनेच्या 'ग्लोबल स्टेटस रिपोर्ट ऑन अल्कोहोल अँड हेल्थ' अहवालानुसार जगभरामध्ये दरवर्षी सुमारे ३३ लक्ष लोक दारूमुळे मृत्युमुखी पडतात. काळजीची बाब म्हणजे प्रौढांच्या तुलनेत तरुणांवरच दारूचे जास्त परिणाम होतात. २० ते ३९ वर्षे वयोगटातील एकूण सर्व मृत्यूंपैकी १३.५ टक्के मृत्यू दारूमुळे होतात. दारूचा वापर हा दोनशेहून अधिक रोग आणि अपघात परिस्थितींना कारणीभूत ठरतो. दारूचे दुष्परिणाम फक्त पिणाऱ्यापुरते मर्यादित राहत नाहीत तर त्यापलीकडे



व्यापक समाजावर देखील होतात, जसे की स्त्रियांवरील अत्याचार, गरिबी वाढणे किंवा रस्त्यांवरील अपघात. एकंदरीत, वैयक्तिक ग्राहक आणि इतर सगळ्यांसाठी, दारू हा बाकी कुठल्याही ड्रगपेक्षा अधिक हानिकारक पदार्थ आहे.

इंटरनॅशनल एजन्सी फॉर रिसर्च ऑन कॅन्सरने वर्गीकृत केल्यानुसार, दारू हा एक टॉक्सिक, सायकोॲक्टिव्ह आणि अवलंबित्व निर्माण करणारा पदार्थ आहे आणि 'ग्रुप वन् कार्सिनोजेन' आहे.

कॅन्सरला कारणीभूत ठरणाऱ्या अतिघातक पदार्थांच्या या गटात ॲस्बेस्टोस, तंबाखू आणि चक्क रेडिएशन यांच्या जोडीने दारूचा समावेश आहे. अन्ननलिका, यकृत, कोलोरेक्टल आणि स्तनाच्या कर्करोगासह सात प्रकारचे कर्करोग दारूमुळे संभवतात आणि जगात दरवर्षी ७.५ लाख नवीन कॅन्सर केसेस दारूमुळे होतात.

दारू असलेले कोणतेही पेय, त्याची किंमत आणि गुणवत्ता काहीही असो, हे कर्करोग होण्याचा धोका निर्माण करतात.

वंचित आणि आर्थिक व सामाजिकदृष्ट्या मागास लोकसंख्येमध्ये दारू-संबंधित मृत्यू, रुग्णालयात दाखल होण्याचे प्रमाण आणि होणारे नुकसान हे जास्त आहे. त्यामुळे दारू ही सर्वसमावेशक विकासाची शत्रू आहे आणि वाढत्या सामाजिक विषमतेला कारणीभूत ठरते. म्हणूनच दारूच्या वापरावर मर्यादा आणणे याचा समावेश आता संयुक्त राष्ट्रांच्या 'सस्टेनेबल डेव्हलपमेंट गोल्स'मध्येही करण्यात आला आहे.

## ।। अभंगवाणी ।।



मजसवें आतां येऊं नका कोणी ।
सासुरवासिनी बाइयानो ॥१॥

न साहवे तुम्हां या जनाची कूट ।
बोलती वाईट ओखटें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# खातेवाटप, पालकमंत्री पदावरही लक्ष

## » चालू महिन्यातच होणार राज्य मंत्रिमंडळाचा विस्तार

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्य मंत्री मंडळाचा पुन्हा विस्तार होणार असल्याची चर्चा रंगली आहे. हा विस्तार याच महिन्यात म्हणजेच ऑगस्टमध्येच होण्याची शक्यता असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. या वेळी मंत्री मंडळ विस्तारात महायुतीच्या आणखी आमदारांना संधी मिळणार आहे.**



त्यामुळे गेल्यावेळी प्रतीक्षेत असलेल्या आमदारांच्या पुन्हा एकदा मंत्रीपदाच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत. या वेळी शिंदे गटाच्या आमदारांना संधी दिली जाणार का? असा प्रश्न आहे. आता होणाऱ्या मंत्रीमंडळ विस्तारात राज्यमंत्र्यांचीही नेमणूक होणार आहे. शिवसेना, भाजप आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदारांना यात संधी दिली जाणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. शिंदे गटातील अनेक आमदार मंत्रीपदाची अपेक्षा लावून बसलेले आहेत. शिंदे-फडणवीस सकारच्या कार्यकाळात सरकार स्थापनेनंतर आता पर्यंत दोन वेळा मंत्रिमंडळ विस्तार झाला आहे. यात दुसऱ्या वेळी अजित पवार यांच्यासह राष्ट्रवादीच्या आमदारांचा मंत्रिमंडळ समावेश झाल्यामुळे शिंदे गटाचे तसेच भाजपचेही आमदार नाराज झाले होते. मात्र, आता या नाराज आमदारांना खुष करण्याचा तिन्ही पक्षांचा प्रयत्न असणार आहे. राज्य सरकारमध्ये राष्ट्रवादीच्या प्रवेशामुळे शिंदे गटाच्या आमदारांच्या मंत्रीपदाच्या अपेक्षेवर पाणी फिरले होते. त्यातच आता लवकरच पुन्हा मंत्रिमंडळ विस्तार होण्याचा दावा केला जात असून, ज्यात शिंदे गटाच्या आमदारांना संधी दिली जाणार असल्याचे बोलले जात आहे. मंत्रिमंडळाच्या विस्ताराबरोबरच खातेवाटप आणि पालकमंत्र्यांच्या नियुक्तीवरही सर्वांचे लक्ष आहे. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडील महत्त्वाची खाती राष्ट्रवादीकडे गेली आहेत. त्यामुळे शिंदे गट नाराज आहे. या वेळी मात्र, विस्तारात चांगली खाती पदरात पाडून घेण्यासाठी सर्व पक्ष प्रयत्नात असल्याचे दिसून येते.

### राज्यमंत्र्यांचीही नेमणूक होणार

» राज्यात पुन्हा एकदा मंत्रिमंडळ विस्ताराचे वारे सुरू झाले आहेत. राज्य सरकारचा रखडलेला मंत्रिमंडळ विस्तार विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनानंतर पार पडेल. त्यात महायुतीच्या आणखी काही आमदाराना संधी मिळेल, अशी माहिती विश्वसनीय सूत्रांनी बुधवारी एका मराठी वृत्तवाहिनीशी बोलताना दिली आहे. प्रस्तावित मंत्रिमंडळ विस्तारात राज्यमंत्र्यांचीही नेमणूक होणार आहे. यात शिवसेना, भाजप व राष्ट्रवादी या तिन्ही पक्षांच्या नेत्यांना समसमान संधी मिळणार असल्याचाही दावा केला जात आहे.

# लग्न एकाशी अन् संसार दुसऱ्याशी!

## » प्रकाश आंबेडकरांची पवारांवर टीका

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**अजित पवारांसह चाळीस आमदारांनी बंडखोरी केल्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडली आहे. पक्षफुटीनंतर चार-पाच दिवस अजित पवार गट आणि शरद पवार गटाने एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप केले. पण त्यानंतर दोन्ही गटातील नेतेमंडळी मात्र शांत झाल्याचे पाहायला दिसून येत आहे. पावसाळी अधिवेशनात देखील दोन्ही गटाचे नेतेमंडळी एकमेकांची गळाभेट घेताना दिसत आहेत.**



### भारतातील जनतेला फसवू नका

» प्रकाश आंबेडकरांनी एक मीम शेअर करत शरद पवारांवर टीका केली जेव्हा तुम्ही एखाद्या गोष्टीकडे वेगवेगळ्या भिंगातून पाहता, तेव्हा तुमच्या लक्षात येतं की 'गोरमेंट आंटी' अगदी बरोबर बोलली होती. तुम्हाला (शरद पवार) जर द्वेष, जातीवाद आणि मृत्यूच्या व्यापाऱ्याबरोबर (भाजपा) जायचं असेल, तर खुशाल जावा. पण तुम्ही पक्षफुटीचा स्टंट करून महाराष्ट्र आणि भारतातील जनतेला फसवू नका. शरद पवार हे नेहमीच दुतोंडी वागले आहेत. ते लग्न एकाशी करतात आणि संसार दुसऱ्याबरोबर थाटतात.

त्यामुळे त्यांच्या भूमिकांबद्दल राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांसह जनतेमध्ये देखील संभ्रम आहेच.

त्यातच काल तर राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार हे पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या पुरस्कार सोहळ्याला उपस्थित राहिले. या कार्यक्रमात मुख्यमंत्री शिंदे, उपमुख्यमंत्री फडणवीस आणि अजित पवारांची देखील उपस्थिती होती. या कार्यक्रमाला शरद पवारांनी उपस्थिती लावल्याने मविआ नेत्यांच्या भुवया उंचावल्या आहेत.

या राजकीय घडामोडींनंतर वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकरांनी शरद पवारांवर टीका केली. प्रकाश आंबेडकरांनी एक मीम शेअर करत शरद पवारांवर टीका केली आहे.

ते ट्वीटमध्ये म्हणाले, जेव्हा तुम्ही एखाद्या गोष्टीकडे वेगवेगळ्या भिंगातून पाहता, तेव्हा तुमच्या लक्षात येतं की 'गोरमेंट आंटी' अगदी बरोबर बोलली होती. तुम्हाला (शरद पवार) जर द्वेष, जातीवाद आणि मृत्यूच्या व्यापाऱ्याबरोबर (भाजपा) जायचं असेल, तर खुशाल जावा. पण तुम्ही पक्षफुटीचा स्टंट करून महाराष्ट्र आणि भारतातील जनतेला फसवू नका. शरद पवार हे नेहमीच दुतोंडी वागले आहेत.

ते लग्न एकाशी करतात आणि संसार दुसऱ्याबरोबर थाटतात. या ट्वीटमध्ये प्रकाश आंबेडकरांनी सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या महिलेचा मीम शेअर केला आहे.

संबंधित मीममधील महिलेनं काही दिवसांपूर्वी सरकारविषयी अपशब्द उच्चारत टीका केली होती. सर्वजण मिळून आम्हाला पागल बनवत आहेत, अशी टीका त्या महिलेनं केली होती. त्यानंतर या महिलेची सोशल मीडियावर 'गोरमेंट आंटी' अशी ओळख निर्माण झाली.

# भिडे फ्रॉड माणूस!

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाचा आजचा दिवस संभाजी भिडेंच्या वादग्रस्त विधानांच्या मुद्यावर चांगलाच गाजला. काँग्रेस सदस्यांनी या प्रकरणी विधानसभा डोक्यावर घेत, भिडेंवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. विशेषतः पृथ्वीराज चव्हाण यांनी भिडेंच्या कथित संस्थेचा विषय सभागृहाच्या पटलावर उपस्थित करत हा माणूस कोणत्या आधारावर सोने गोळा करत आहे, असा सवाल उपस्थित केला. सभागृहात पृथ्वीराज चव्हाण म्हणाले की, संभाजी भिडे यांच्याकडून सोने मागण्यात येते. त्यांच्या संस्थेची सरकार दरबारी नोंदणी आहे का? मी भिडेंच्या अटकेची मागणी केली. त्यानंतर मला फोन व ई-मेलवरुन धमक्या मिळाल्या. या धमक्या देणाऱ्याला पोलिसांनी अटक केली. पण तो जामिनावर सुटला. ते पुढे म्हणाले की, समाजासाठी काम करत असताना आम्हाला अशा धमक्या येतात. आम्ही त्याला भीक घालत नाही. पण, आमच्या अन्यही काही नेत्यांना धमक्या देण्यात आल्यात. त्यामुळे या धमकावणाऱ्या लोकांना धमकी देण्यासाठी कुणीतरी प्रवृत्त करत आहे का? यामागील खरे सूत्रधार कोण आहेत? याचा शोध घेण्याची गरज आहे. संभाजी भिडे अत्यंत फ्रॉड माणूस आहे. त्याची त्याची डिग्री कोणती आहे? त्याने कुठे शिक्षण घेतले? हा कुठे प्राध्यापक होता? सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे, हा माणूस सोने गोळा करत आहे. कायद्यानुसार, एखाद्या संस्थेला वर्गणी गोळा करायची असेल, तर त्या संस्थेला जिल्हाधिकाऱ्यांकडे नोंदणी करावी लागते. त्याचा हिशेब द्यावा लागतो. पण हा माणूस कितीतरी टनाने सोने गोळा करत आहे. तो सध्या प्रत्येकाकडून 1 ग्रॅम सोने घेत आहे. लोकांची व तरुणांची हेतूपुरस्सर दिशाभूल करत आहे. संभाजी भिडे ऐन परीक्षेच्या काळात काहीतरी गडकिल्ल्याची मोहीम काढतो. बहुजन समाजाची मुले कुठेतरी फरफटत जावीत, हा त्याचा मूळ उद्देश आहे, असा आक्रमक शैलीत पृथ्वीराज चव्हाण यांनी बुधवारी विधानसभेत संभाजी भिडेंच्या मुद्यावरून सरकारला घेरण्याचा प्रयत्न केला.

# 370 वर नियमित सर्वोच्च सुनावणी

## »विधानसभा अस्तित्त्वात नसताना शिफारस कोणाची?

**। नवी दिल्ली ।**

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**जम्मू आणि काश्मीरमध्ये विधानसभा (कॉन्स्टिट्युएंट असेंब्ली) अस्तित्त्वात नसताना तेथील अनुच्छेद ३७० रद्द करण्याची शिफारस कोण करू शकते, असा सवाल सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी केला. जम्मू आणि काश्मीरला विशेष राज्याचा दर्जा देणारे अनुच्छेद ३७० रद्द करण्याच्या केंद्र सरकारच्या ५ ऑगस्ट २०१९ रोजीच्या निर्णयाला आवाहन करणाऱ्या याचिकांवर बुधवारी सुनावणी सुरू झाली.**

सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या नेतृत्वात पाच सदस्यीय घटनापीठामध्ये न्या. संजय किशन कौल, न्या. संजीव खन्ना, न्या. भूषण गवई आणि न्या. सूर्यकांत यांचा समावेश आहे. याचिकाकर्त्यांचे वकील कपिल सिबल यांना घटनापीठाने विचारले की, जो अनुच्छेद तात्पुरती तरतूद असल्याचे राज्यघटनेमध्ये नमूद करण्यात आले आहे, जम्मू आणि काश्मीरच्या विधानसभेचा (कॉन्स्टिट्युएंट असेंब्ली) कार्यकाळ १९५७ संपल्यानंतर तो कायमस्वरूपी कसा झाला? यावेळी घटनापीठाने अनुच्छेद ३७० च्या पोटकलम ३ चा संदर्भ दिला. 'कॉन्स्टिट्युएंट असेंब्लीचा कार्यकाळ संपतो तेव्हा काय होते, कोणत्याही कॉन्स्टिट्युएंट असेंब्लीचे आयुष्य अमर्याद कसे काय असू शकते', असे प्रश्न सरन्यायाधीशांनी सिबल यांना विचारले. अनुच्छेद ३७० मधील पोटकलम ३ नुसार राज्यासाठी कॉन्स्टिट्युएंट असेंब्लीची शिफारस केली जाते आणि कॉन्स्टिट्युएंट असेंब्लीसाठी शिफारस आवश्यक असल्याची अधिसूचना राष्ट्रपती काढू शकतात असे त्यामध्ये सांगण्यात आले आहे. पण जेव्हा ही कॉन्स्टिट्युएंट असेंब्लीच अस्तित्त्वात राहत नाही तेव्हा काय होते हा प्रश्न आहे, असे सरन्यायाधीश चंद्रचूड म्हणाले. सरन्यायाधीशांच्या प्रश्नाला उत्तर देताना सिबल म्हणाले की, हाच मुद्दा आहे. कॉन्स्टिट्युएंट असेंब्लीच्या शिफारशीशिवाय राष्ट्रपती अनुच्छेद ३७० रद्द करण्याची कोणतीही अधिसूचना काढू शकत नाही याबद्दलच हा खटला आहे. त्यावर न्या. गवई यांनी विचारले की, याचा अर्थ १९५७ नंतर (जम्मू आणि काश्मीरची कॉन्स्टिट्युएंट असेंब्ली संपुष्टात आल्यानंतर) अनुच्छेद ३७० बाबत काहीही करता येऊ शकले नसते असा हा युक्तिवाद आहे का? त्यावर सिबल यांनी उत्तर दिले की न्यायालय सध्या घटनात्मक तरतुदीचा अर्थ लावत आहे, राज्यघटनेला ज्ञात नसलेली प्रक्रिया कायदेशीर करण्यासाठी हा खटला सुरू नाही. यानंतर बुधवारी सुनावणी अपूर्ण राहिली, ती आता गुरुवारी पुढे सुरू राहील.



> ५ ऑगस्ट २०१९ रोजी जम्मू आणि काश्मीरच्या बाबतीत जे झाले ते चूक होते. ते राज्यघटना आणि कायद्याविरोधात होते. आम्हाला आमची तक्रार मांडण्याची संधी मिळाली आहे. देशातील इतर नागरिकांप्रमाणेच आम्हाला न्याय मिळण्याची अपेक्षा आहे.
>
> **– ओमर अब्दुल्ला, माजी मुख्यमंत्री, जम्मू-काश्मीर**

> देशातील यंत्रणा कशा बिघडवण्यात आल्या आहेत हे सर्वोच्च न्यायालयाला पाहावे लागेल. केवळ सर्वोच्च न्यायालयच भारताची राज्यघटना वाचवू शकते. भारताचा कारभार राज्य घटनेप्रमाणे चालतो याची खात्री देऊ शकणारी देशात सर्वोच्च न्यायालय ही एकमेव संस्था उरली आहे.
>
> **– मेहबुबा मुफ्ती, माजी मुख्यमंत्री**

# राज्यसभेत 'शांतते'त कामकाज

## »विधेयकावर चर्चा न होताच लोकसभा तहकूब

**। नवी दिल्ली ।**

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**राज्यसभेत विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगेंना बोलू दिले जात नसल्याच्या आरोप करत बुधवारी विरोधी पक्षांच्या सदस्यांनी सभात्याग केला. त्यामुळे वरिष्ठ सभागृहात प्रश्नोत्तराचा तास तसेच उर्वरित कामकाज 'शांतते'त पार पडले. विरोधी बाकांवर एकही सदस्य नसल्याने या आठवड्यामध्ये राज्यसभेत विनाविरोध विधेयके मंजूर केली जात आहेत. खाणविषयक दुरुस्ती विधेयक बुधवारी संमत केले गेले.**

विरोधकांच्या शिष्टमंडळाने राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतल्यानंतर, खरगेंनी पत्रकारांशी संवाद साधताना सभागृहात मी बोलायला लागल्यावर दोन मिनिटांमध्ये माइक बंद केला जातो, ही बाब राष्ट्रपतींच्या नजरेला आणल्याचे सांगितले. खरगेंच्या या विधानाचे पडसाद सभागृहात उमटले. दुपारच्या सत्राचे कामकाज सुरू होताच, खरगेंनी बोलू देण्याची विनंती उपसभापती हरिवंश यांना केली. खरगेंना ही परवानगी लगेच देण्यात आली.

'मी तुम्हाला बोलू देत आहे. नाहीतर तुम्ही सभागृहाबाहेर जाऊन माइक बंद केल्याचा आरोप कराल', असे हरिवंश खरगेंना म्हणाले. पण विरोधकांच्या गोंधळात खरगेंसमोरील माइक पुन्हा बंद झाला. त्याविरोधात विरोधकांनी सभात्याग केला. राज्यसभेत सकाळच्या सत्रातही विरोधी पक्षांच्या सदस्यांनी सभात्याग केल्यामुळे सभापती धनखड यांनी प्रश्नोत्तराचा तास विनाअडथळा घेतला. लोकसभेत विरोधकांच्या सातत्याने होणाऱ्या गोंधळामुळे कामकाज तहकूब करावे लागत असल्याने लोकसभाध्यक्ष ओम बिर्ला नाराज झाले आहेत. जोपर्यंत विरोधकांच्या सभागृहातील वर्तनामध्ये सुधारणा होत नाही व कामकाज सुरळीत सुरू होत नाही, तोपर्यंत मी सभागृहात येणार नाही, असा निर्धार बिर्ला यांनी केला असल्याचे समजते. त्यामुळे बुधवारी बिर्ला लोकसभेत आले नाहीत. त्यांच्याऐवजी पीठासीन अधिकाऱ्यांनी कामकाज पाहिले. दिल्लीसंदर्भातील विधेयक लोकसभेत मंगळवारी मांडले गेले होते व त्यावर सभागृहात बुधवारी चर्चा होऊन ते संमत केले जाणार असल्याचे सांगितले जात होते. लोकसभेच्या कामकाज सूचीमध्येही विधेयकावरील चर्चेचा समावेश करण्यात आला होता.



### याचिकाकर्त्यांचा युक्तिवाद

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी मणिपूरमधील दोन महिलांना राज्यसभेवर नियुक्त करावे, अशी मागणी विरोधी पक्षांनी बुधवारी केली. तृणमूल काँग्रेसच्या नेत्या सुष्मिता देव यांनी ही सूचना केली, विरोधी गटाच्या एका शिष्टमंडळाने राष्ट्रपतींची भेट घेतली आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना संघर्षग्रस्त मणिपूरमधील परिस्थितीवर संसदेला संबोधित करण्यास सांगण्याची विनंती केली. "मणिपूरमधील वेगवेगळ्या समुदायातील दोन महिलांना राज्यसभेवर नामनिर्देशित करणे हे राज्यातील महिलांवर होणारे गंभीर नुकसान आणि उल्लंघन सुधारण्यासाठी एक लहान उपाय म्हणून काम करेल," असे देव यांनी यावेळी सांगितले.

# माफी मागणार नाही : राहुल गांधी

**। नवी दिल्ली ।**

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

'मोदी' आडनावावरून केलेल्या टिप्पणीबद्दल आपण दोषी नसून याप्रकरणी माफी मागणार नाही, असे काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी बुधवारी सर्वोच्च न्यायालयात स्पष्ट केले. याप्रकरणी फिर्यादीशी तडजोड करायची असती तर ती यापूर्वीच केली असती, असेही त्यांनी सांगितले. मानहानी खटल्यात सुरत महान्यायदंडाधिकाऱ्यांनी दोषी ठरवलेल्या निर्णयाला स्थगिती द्यावी, अशी विनंती राहुल यांनी सर्वोच्च न्यायालयाला केली.

लोकप्रतिनिधी कायद्यातील तरतुदींअंतर्गत गुन्हेगारी प्रक्रिया आणि त्याच्या परिणामाचा वापर करून याचिकाकर्त्यांचा दोष नसतानाही त्याच्यावर माफी मागण्यासाठी दबाव टाकला जात आहे, हा न्यायालयीन प्रक्रियेचा अतिशय गैरवापर आहे असा आरोप राहुल यांनी केला आहे. राहुल यांना दोन वर्षांची शिक्षा सुनावण्यात आल्यानंतर लोकप्रतिनिधी कायद्यातील तरतुदीनुसार त्यांची खासदारकी रद्द झाली आहे. राहुल यांनी दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात असे नमूद केले आहे की, याचिकाकर्त्यांला गुन्ह्यासाठी दोषी असल्याचे मान्य नाही आणि या प्रकरणात माफी मागून तडजोड करायची असती तर आपण ते फार पूर्वी केले असते. पूर्णेश मोदी यांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या प्रति-प्रतिज्ञापत्राच्या उत्तरादाखल राहुल गांधी यांनी हे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. तसेच केवळ आपण माफी मागायला नकार दिला म्हणून पूर्णेश मोदी यांनी आपल्याविरोधात 'उद्धट'सारखा निंदानालस्ती करणारा शब्दप्रयोग वापरला आहे असे राहुल यांनी म्हटले आहे. आपल्या भाषणामध्ये 'मोदी' आडनावावरून कोणत्याही समुदाय किंवा समाजाचा उल्लेख केलेला नाही आणि त्यामुळे संपूर्ण 'मोदी' समुदायाची मानहानी केल्याचा प्रश्नच उद्भवत नाही असे राहुल यांनी म्हटले आहे. 'सर्व चोरांचे आडनाव मोदी का आहे' असे वक्तव्य राहुल यांनी कर्नाटकातील कोलार येथे २०१९ च्या लोकसभा निवडणूक प्रचारसभेमध्ये केले होते.

# रॉकी-राणीची दमदार कमाई सुरूच



रॉकी और राणी की प्रेमकहाणी हा चित्रपट चांगली कमाई करत आहे. मंगळवारी या चित्रपटाने 7.30 कोटींची कमाई केली आहे. चित्रपटाचे एकूण कलेक्शन 60.22 कोटी रुपये झाले आहे. आठवड्याचे दिवस असूनही चित्रपटाने चांगली कमाई केली आहे. रविवारच्या तुलनेत सोमवार आणि मंगळवारच्या कलेक्शनमध्ये थोडीशी घट झाली असली, तरी पहिल्या 5 दिवसांत चित्रपटाची एकूण कमाई वाईट आहे असे म्हणता येणार नाही. ट्रेड एनालिस्ट तरण आदर्श यांच्या मते, चित्रपट दुसऱ्या वीकेंडमध्येही चांगली वाढ दाखवू शकतो. करण जोहरचा हा फॅमिली ड्रामा चित्रपट लोकांना आवडला आहे. थिएटरमध्ये गर्दी पाहायला मिळते. या चित्रपटाची बरीच माउथ पब्लिसिटी झाली आहे. त्याचा प्रभाव चित्रपटाच्या कलेक्शनवर दिसून येतो. रणवीर सिंहला रॉकी आणि राणीकडून खूप आशा आहेत. त्याचे शेवटचे दोन चित्रपट सुपर फ्लॉप ठरले आहेत. रोहित शेट्टी दिग्दर्शित सर्कस केवळ 35.65 कोटींची कमाई करू शकला.

जयेशभाई जोरदार तर त्याहून वाईट होता. त्याने बॉक्स ऑफिसवर केवळ 15.59 कोटी रुपये कमावले. '83' चित्रपटाने सरासरी, तर गली बॉयने चांगला व्यवसाय केला. रॉकी आणि राणीचे आतापर्यंतचे कलेक्शन चांगले आहे. आता आगामी काळात चित्रपटाची कमाई कायम राहते की नाही हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे. आलिया भट्टचे मागील काही चित्रपट हिट ठरले आहेत. त्याच्या 'ब्रह्मास्त्र' या चित्रपटाचे कलेक्शन 257.44 कोटी होते. चित्रपटाच्या बजेटनुसार कलेक्शन चांगले नव्हते. गंगुबाई काठियावाडी नक्कीच हिट ठरली. याशिवाय राझी सुपरहिट ठरला, पण कलंक फ्लॉप ठरला होता. या चित्रपटाने पहिल्या 5 दिवसांत 60 कोटींहून अधिक कमाई केली आहे. चित्रपटाचे एकूण बजेट 178 कोटी आहे.

त्यानुसार चित्रपटाचे बजेट जवळपास संपले आहे. या चित्रपटाने आतापर्यंत डिजिटल राइट्समधून 80 कोटी रुपये आणि सॅटेलाइट राइट्समधून 50 कोटी रुपये कमावले आहेत. याशिवाय निर्मात्यांनी त्याचे संगीत हक्क 30 कोटी रुपयांना विकले आहेत. या सर्वांसह आतापर्यंत 160 कोटी रुपये वसूल झाले आहेत. त्यानुसार, चित्रपटाने रिलीज होण्यापूर्वीच त्याच्या बजेटच्या 90% वसूल केले होते.

# वाणी कपूरचा रॅम्प वॉक

वाणी कपूरने 8व्या दिवशी इंडिया कॉउचर वीक 2023 शोमध्ये रॅम्प वॉक केला. वाणीच्या कार्यक्रमाचे अनेक व्हिडिओ आणि फोटो सोशल मीडियावर समोर आले आहेत. या कार्यक्रमात अभिनेत्रीने फॅशन डिझायनर ईशा जेसाठी रॅम्प वॉक केला. या फॅशन इव्हेंटमध्ये ईशा जेच्या रोझरूमने तिचे कलेक्शन 'रोमँटिक रेव्हरी' सादर केले. वाणीने चिकनकारी वर्क असलेला लाल रंगाचा लेहेंगा परिधान केला होता. यासोबत तिने मॅचिंग ब्लाउज आणि लाल दुपट्टा घेतला होता, ज्यामध्ये ती खूपच ग्लॅमरस दिसत होती. मेकअप, डायमंड ज्वेलरी आणि मोकळ्या केसांनी तिने या लुकला पूर्ण केले. सोशल मीडियावर चाहते तिच्या सौंदर्याचे कौतुक करत आहेत. वाणीने तिच्या शानदार रॅम्पवॉकने चाहत्यांना खूप प्रभावित केले आहे. व्हिडिओचे कौतुक करताना एका यूजरने लिहिले की, 'रेड ब्यूटी'. आणखी एका युजरने लिहिले, 'सुंदर'. तिसऱ्याने टिप्पणी करताना लिहिले, 'व्वा क्या बात है... वाणी कपूर अखेरची रणबीर कपूरच्या 'शमशेरा' चित्रपटात दिसली होती. तिने वॉर, बेफिक्रे आणि 'शुद्ध देसी रोमान्स' यांसारख्या चित्रपटात काम केले आहे. आता ती लवकरच यशराज फिल्म्सच्या ओटीटी शो 'मंडला मर्डर्स'मधून ओटीटीमध्ये पदार्पण करणार आहे. याशिवाय तिच्याकडे 'सर्वगुण संपन्ना' हा चित्रपटही आहे.



# त्याला हसताना पाहून मन आनंदित

अभिनेता सुशांत सिंG राजपूतच्या मृत्यूला 3 वर्षे पूर्ण झाली आहेत. असे असूनही चाहते आजही त्याची आठवण काढत असतात. त्याची बहीण श्वेता सिंह कीर्तीदेखील अनेकदा दिवंगत अभिनेत्याचे फोटो सोशल मीडियावर शेअर करत असते. श्वेताने मंगळवारी रात्री भावाचा फोटो शेअर केला. थ्रो-बॅक फोटो शेअर करताना श्वेताने सांगितले की, एका चाहत्याने हा फोटो तिला पाठवला होता. या फोटोत आपल्या भावाला हसताना पाहून श्वेता भावुक झाली. पोस्ट शेअर करत श्वेताने लिहिले- 'कोणीतरी भावाचा हा सुंदर फोटो पाठवला, त्याचे हास्य पाहून माझे मन आनंदित झाले.' हे छायाचित्र लोकप्रिय एमएस धोनी या चित्रपटातील आहे, ज्यामध्ये सुशांत हसताना दिसत आहे. चित्रपटातील बाकीचे कलाकारही त्याच्याभोवती उभे आहेत.





# ड्रीम गर्ल 2 ट्रेलर हसून करेल वेडं!

बॉलिवूड अभिनेता आयुष्मान खुरानाचे चाहते गेल्या काही दिवसापासून त्याच्या मोस्ट अवेटेड चित्रपट 'ड्रीम गर्ल 2' ची वाट पाहत होते.खुप प्रतिक्षेनंतर आता या चित्रपटाचा ट्रेलर रिलीज करण्यात आला. हा ट्रेलर रिलिज झाल्यानंतर चाहत्यांमध्ये चित्रपटाविषयीची उत्सुकताही द्विगुणित झाली आहे. या चित्रपटात पुन्हा एकदा आयुष्मान पूजाच्या भूमिकेत पाहण्यासाठी चाहते उत्सुक आहेत. तीन मिनिटाच्या या ट्रेलरमध्ये आयुष्मान खुरानाने पुजाचं पात्र खुपच उत्तमरित्या साकारल्याचं दिसतयं. तो चाहत्यांना पोट धरुन हसवण्यात यशस्वी झाला आहे. यावेळी चित्रपटाच्या कथेत बराच बदल आहे. पुर्वीच्या कथेपेक्षा यात प्रेक्षकांना वेगळ्या रुपात पूजा दिसणार आहे. यावेळी अनन्या पांडे आयुष्मानसोबत रोमान्स करताना दिसत आहे. अनन्या पांडे चित्रपटात वकिलाच्या भूमिकेत आहे. तिलाआयूष्यमानसोबत लग्न करायचं आहे. तिचे वडील आयुष्मानसमोर एक अट ठेवतात ज्यामुळे आयुष्यमानला पुन्हा एकदा पूजाच्या रुपात यावं लागतं. त्यानंतर खरा खेळ सुरु होतो. पहिल्या ड्रिम गर्लमध्ये आयुष्मान खुरानासोबत नुसरत भरुचा दिसली होती, मात्र यावेळी तिच्या ऐवजी अनन्या पांडे या चित्रपटात दिसणार आहे. दोघांशिवाय विजय



# नाना अशोक मामांचे पाय चेपायचे

अशोक सराफ म्हणजेच अवघ्या मनोरंजन विश्वाचे मामा. नुकतीच मामांची पंच्याहत्तरी झाली. अशोक मामा आणि त्यांचे मित्र म्हंटलं कि डोळ्यापुढे लक्ष्मीकांत बेर्डे, सचिन पिळगावकर, महेश कोठारे हि मंडळी अगदी सहज समोर येतात. अर्थात त्यांच्यात घट्ट मैत्री आहे आणि त्यांनी अनेक सिनेमे एकत्र केले आहेत. पण अशोक मामांच्या आयुष्यात असा एक मित्र आहे जो खूप जवळचा आहे खास आहे आणि तो मित्र म्हणजे मराठी सह बॉलीवूड मध्ये आपल्या अभिनयाचा दरारा दाखवणारे ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर. नाना आणि मामा म्हणजेच नाना पाटेकर आणि अशोकसराफ यांच्यातील मैत्री ही शब्दात सामावणारी नाही. कारण रंगभूमीवर पाऊल ठेवल्यापासून एकमेकांच्या पडत्या काळात सोबत पर्यंत ते अगदी सुपरस्टार होईपर्यंत ते कायमच एकमेकांच्या सोबत राहिले आहे. सध्या सर्वत्र मैत्री दिवस म्हणजेच फ्रेंडशिप डेचे वारे वाहू लागले असल्याने या नाना मामांची मैत्री कशी होती ते जाणून घेऊया.. अशोक सराफ आणि नाना पाटेकर यांनी एकमेकांना दिलेली साथ ते अजूनही विसरलेले नाहीत. एका मुलाखतीत अशोक मामा म्हणाले होते की, नानाने माझा जीव वाचवला आहे. तो किस्सा असा होता की, एकदा नाटक रद्द झाल्याने लोक अशोक सराफ यांना मारण्यासाठी माझ्या मागे धावले होते.

# टीम इंडियाने मारली बाजी!

## » कसोटीत इंग्लंड आणि ऑस्ट्रेलियाला टाकले मागे

**नवी दिल्ली ।**
**नवी दिल्ली। वृत्तसंस्था**

**वेस्ट इंडिजविरुद्ध जिंकलेल्या केवळ एका कसोटी सामन्याच्या आधारे भारतीय संघाला मोठा फायदा झाला आहे. या विजयाच्या जोरावर टीम इंडियाने डब्ल्यूटीसी पॉइंट टेबलमध्ये दुसरे स्थान पटकावले आहे असे म्हणतात की जेव्हा कोणाचे नुकसान होते, तेव्हा कोणाला तरी तरी फायदा होतो. असाच काहीसा प्रकार टीम इंडियाच्या बाबतीत घडला आहे. खरं तर, इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील अॅशेस मालिका २-२ अशी बरोबरीत संपल्यानंतर आयसीसीने दोन्ही संघांना स्लो ओव्हर रेटसाठी दंड ठोठावला.**



यासोबतच दोन्ही संघांचे वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप (डब्ल्यूटीसी) गुणही कमी झाले आहेत. यासोबतच दोन्ही संघांचे वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप (डब्ल्यूटीसी) गुणही कमी झाले आहेत. त्यामुळे वेस्ट इंडिजविरुद्ध जिंकलेल्या अवघ्या एका कसोटी सामन्याच्या जोरावर भारतीय संघाला मोठा फायदा झाला आहे. टीम इंडिया १६ गुणांसह डब्ल्यूटीसी गुणतालिकेत दुसऱ्या स्थानावर पोहोचली आहे. ऑस्ट्रेलिया २ सामने जिंकून तिसऱ्या स्थानावर पोहोचला आहे, तर इंग्लंडचा संघ २ सामने जिंकून पाचव्या स्थानावर घसरला आहे. ऑस्ट्रेलियाचे १८ आणि इंग्लंडचे ९ गुण आहेत. भारतापेक्षा जास्त गुण असूनही स्लो ओव्हर रेटमुळे ऑस्ट्रेलियाला फटका बसला आहे. ऑस्ट्रेलियाला -१० गुण आणि इंग्लंडला -१९ गुणांचा दंड आयसीसीकडून ठोठावण्यात आला आहे. आता पॉइंट टेबलमधील टॉप ५ टीम्स पाहता पाकिस्तान १०० टक्के आणि एकूण २४ पॉइंट्ससह टॉपवर आहे. पाकिस्तानने श्रीलंकेविरुद्धचे दोन्ही कसोटी सामने जिंकले.

भारत ६६.६७ टक्के आणि एकूण १६ गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे. पावसामुळे भारताचा एक सामना अनिर्णित राहिला होता. ऑस्ट्रेलियाने विजयाच्या ३० टक्केवारीने आणि एकूण १८ गुणांसह तिसरे स्थान पटकावले आहे. ऑस्ट्रेलियाला २ सामन्यात विजय आणि २ मध्ये पराभवाला सामोरे जावे लागले. त्याचबरोबर एक सामना अनिर्णित राहिला. स्लो ओव्हर रेटमुळे ऑस्ट्रेलियाला हे नुकसान सहन करावे लागले.

### वेस्ट इंडिज चौथ्या क्रमांकावर

» वेस्ट इंडिज चौथ्या स्थानावर आहे. ज्याचे १६.६७ टक्के गुण आणि एकूण ४ गुण आहेत. वेस्ट इंडिजला एका सामन्यात पराभवाचा सामना करावा लागला आणि एक सामना अनिर्णित राहिला. इंग्लंड १५ टक्के गुणांसह एकूण ९ गुणांसह पाचव्या स्थानावर आहे. इंग्लंडने दोन सामने जिंकले आणि दोन गमावले. एक सामना अनिर्णित राहिला. दोन्ही सामने गमावल्यानंतर श्रीलंका सहाव्या स्थानावर आहे. बांगलादेश, दक्षिण आफ्रिका आणि न्यूझीलंड यांनी आतापर्यंत एकही कसोटी मालिका खेळलेली नाही.

# इंडीज मॅनेजमेंटवर हार्दिक नाराज

## » फ्लाइटला 4 तास उशीर ; पुरेशी झोपही नाही

**नवी दिल्ली ।**
**नवी दिल्ली। वृत्तसंस्था**

**टीम इंडियाचा कर्णधार हार्दिक पांड्याने वेस्ट इंडीज क्रिकेट बोर्डाच्या व्यवस्थापनावर नाराजी व्यक्त केली आहे. तो म्हणाला, 'आम्ही चैनीसाठी मागत नाही, पण मूलभूत सुविधा दिल्या पाहिजेत.' एकदिवसीय मालिकेच्या आधी विमानाला 4 तास उशीर झाल्याची तक्रारही अनेक वरिष्ठ खेळाडूंनी बीसीसीआयकडे केली होती. त्यामुळे सामन्यापूर्वी खेळाडूंना पुरेशी झोप घेता आली नाही. दुसऱ्या आणि तिसऱ्या सामन्यात हार्दिकच्या नेतृत्वाखाली टीम इंडियाने वनडे मालिका 2-1 ने जिंकली.**

'ते (त्रिनिदाद) चांगले मैदान आहे. पुढच्या वेळी आम्ही वेस्ट इंडिजमध्ये आलो तर परिस्थिती सुधारण्याची आशा करतो. वेस्ट इंडिज बोर्डाने प्रवासासारख्या गोष्टींकडे थोडे अधिक लक्ष दिले पाहिजे. आम्ही चैनीची मागणी करत नाही तर मूलभूत सुविधा दिल्या पाहिजेत. गेल्या वर्षीही दौऱ्यातील सुविधा अत्यंत निकृष्ट होत्या. खेळाडू आणि कर्मचाऱ्यांना मूलभूत सुविधा मिळतील याकडे वेस्ट इंडिज क्रिकेट बोर्डाने लक्ष दिले पाहिजे, असे मला वाटते. त्याशिवाय या दौऱ्यात उत्कृष्ट क्रिकेट पाहायला मिळाले. टीम इंडियाच्या बाकीच्या क्रिकेटपटूंनीही फ्लाइटला उशीर झाल्याची तक्रार केली होती. त्रिनिदाद ते बार्बाडोसचे विमान रात्री 4 तास उशिराने निघाल्याचे खेळाडूंनी सांगितले होते. त्यामुळे वनडे मालिकेच्या सुरुवातीच्या सामन्यापूर्वी खेळाडूंना पुरेशी झोप घेता आली नाही.



अनेक वरिष्ठ खेळाडूंनी बीसीसीआयला दोन सामन्यांमध्ये फारच कमी वेळ असल्यास रात्री उशिरा उड्डाणे न घेण्याची विनंती केली. कसोटी मालिकेतील शेवटचा सामना 24 जुलै रोजी त्रिनिदाद येथे संपला, संघाला 2 दिवसांनंतर 27 जुलै रोजी बार्बाडोसमध्ये वनडे मालिकेतील पहिला सामना खेळायचा होता. दरम्यान, खेळाडूंनी बीसीसीआयकडे विमान प्रवासाबाबत तक्रार केली. हार्दिकने सामन्यात अर्धशतक ठोकले.

यावर तो म्हणाला, 'मला दीर्घ फलंदाजी करायची होती. मी सामन्यापूर्वी विराटशी (कोहली) बोललो. त्याने मला खेळपट्टीवर थोडा वेळ घालवण्यास सांगितले आणि 50 षटकांच्या फॉरमॅटमध्ये जुळवून घेण्याचा सल्ला दिला. त्याच्या अनुभवाने मला मदत केली, त्याच्याशी बोलून आनंद झाला.

### युवा खेळाडूंना संधी मिळणे आवश्यक

'विराट आणि रोहितसारख्या वरिष्ठ खेळाडूंना विश्रांती मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे ऋतुराज गायकवाडसारख्या युवा खेळाडूंना कामगिरी करण्याची संधी मिळते. आम्हालाही तरुणांना अधिक संधी द्यायची आहेत. भारताने तिसऱ्या वनडेत वेस्ट इंडिजचा 200 धावांच्या मोठ्या फरकाने पराभव केला. यासह संघाने 3 सामन्यांची वनडे मालिका 2-1 ने जिंकली.

# इंग्लंड-ऑस्ट्रेलियावर मोठी कारवाई !

**नवी दिल्ली ।**
**नवी दिल्ली। वृत्तसंस्था**

इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील कसोटी मालिका नुकतीच संपली. अॅशेस मालिका २-२ अशी बरोबरीत राहिली, परंतु ऑस्ट्रेलियाने गतविजेते म्हणून ट्रॉफी राखली. बेन स्टोक्सच्या नेतृत्वाखालील इंग्लंड संघाने पहिल्या दोन सामन्यात पिछाडीवर पडल्यानंतर मालिका बरोबरीत संपवली. या मालिकेनंतर आयसीसीने दोन्ही संघाला मोठा दणका दिला आहे. आयसीसीने स्लो ओव्हर रेटसाठी दोन्ही संघांना दंड ठोठावला आहे. त्यामुळे वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या गुणतालिकेत संघाचे मोठे नुकसान झाले आहे. केवळ गुणांमध्येच फरक नाही, तर विजयाच्या टक्केवारीतही मोठी घसरण झाली आहे. अॅशेसदरम्यान स्लो ओव्हर रेटमुळे आयसीसीने हे पाऊल उचलले आहे. आयसीसीने वेबसाइटवर पोस्ट केलेल्या एका प्रेस रिलीजमध्ये, बुधवारी सांगितले की, इंग्लंड आणि ऑस्ट्रेलियालाअॅशेसमध्ये निर्धारित वेळेत कमी टाकलेल्या प्रत्येक षटकासाठी एक डब्ल्यूटीसी पॉईंट आणि मॅच फीची कपात करण्यात आली आहे. आयसीसीने म्हटले आहे की, "सुधारित नियमांनुसार, दोन्ही संघांना त्याच्या मॅच फीच्या पाच टक्के दंड ठोठावण्यात आला आहे. त्याचबरोबर निर्धारित वेळेत कमी टाकलेल्या प्रत्येक षटकासाठी एक डब्ल्यूटीसी पॉइंट कट केला आहे." अॅशेसच्या चौथ्या कसोटीत ऑस्ट्रेलियाला स्लो ओव्हर रेटसाठी १० गुणांची कपात करण्यात आली. यजमान इंग्लंडला मात्र अॅशेसमध्ये अधिक त्रास सहन करावा लागला आणि पाचपैकी चार कसोटी सामन्यांमध्ये स्लो ओव्हर-रेटसाठी १९ गुणांची कपात करण्यात आली आहे. आयसीसीने सांगितले की, "इंग्लंड एजबॅस्टन येथील पहिल्या कसोटीत निर्धारित वेळेत दोन षटके, लॉर्ड्सवरील दुसऱ्या कसोटीत नऊ, ओल्ड ट्रॅफर्डवरील चौथ्या कसोटीत तीन आणि ओव्हलवरील पाचव्या आणि अंतिम कसोटीत पाच षटके कमी टाकली होती.